# कुंडलमध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

कुंडल : वार्ताहर

येथील क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये ९ ऑगस्ट या क्रांतीदिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले असल्याची माहिती या स्पर्धेचे निमंत्रक सांगली जिल्हा परिषदेचे गटनेते शरद भाऊ लाड यांनी दिली. यावेळी प्राचार्य डा.के. एम. नलावडे, डॉ. प्रताप लाड, प्रा. जगन्नाथ पाटील, प्रा. डॉ. बाळकृष्ण वाघमारे, प्रा, डॉ. धनंजय होनमाने, प्रा. गणेश खारगे उपस्थीत होते.

शरद लाड म्हणाले, क्रांतीअग्रणी जी. डी. बापूंनी स्वातंत्र्या-नंतरही तंटामुक्ती, दारुबंदी, अस्पृश्यतः निवारण यासारख्या उपक्रमातून ही समाजाभिमुख चळवळ पुढे सुरु ठेवली, समता, बंधूता व नैतिक मुल्यांच्या आधारावर हा समाज उभा राहुन राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी व शिक्षण , सहकार, कृषि, राजकीय व सामाजिक क्षेत्रामध्ये सुधारणा होणेसाठी रचनात्मक कार्य केले. या त्यांच्या कृतिशिल विचारांचा वारसा घेऊन महाविद्यालयामध्ये ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे.



जी. डी. बापू लाड

या स्पर्धेमध्ये जी. डी. बापू लाड एक क्रांतीअग्रणी, संवाद हरवलेल कुटूंब, आरक्षण : समताधिष्टीत समाज निर्माण करु शकेल?, संघर्ष, शेतकऱ्यांना कर्जमाफी की हमिभाव हवा, नोटाबंदिचे वादळ, सोशल मिडीयाः प्रबोधन की मोहजाल असे विषय असून प्रथम क्रमांकासाठी सात हजारांचे बक्षीस . असून या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयीन युवक युवतींनी सहभाग घ्यावा असे आवाहन त्यांनी शेवटी केले.

दै. केसरी दि. ६/८/२०१८

सांगली पान १०
तरुण भारत ८/८/१७

# ऑगस्ट क्रांती दिनानिमित्त कुंडलमध्ये वक्तृत्व स्पर्धा

वार्ताहर
कुंडल

येथील क्रांतीअग्रणी जी. डी , बापू लाड महाविद्यालयामध्ये ९ ऑगस्ट या क्रांतीदिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असल्याची माहिती या स्पर्धेचे निमंत्रक सांगली जिल्हा परिषदेचे राष्ट्रवादीचे गटनेते शरद भाऊ लाड यांनी दिली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.के. एम.नलावडे, डॉ. प्रताप लाड, प्रा . जगन्नाथ पाटील, प्रा.डॉ.बाळकृष्ण वाघमारे, प्रा.डॉ.धनंजय होनमाने, प्रा. गणेश खारगे आदी उपस्थीत होते .

यावेळी शरद लाड म्हणाले, भारताच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये संपूर्ण भारतामध्ये चार ठिकाणी प्रतिसरकारे स्थापन झाली. त्यामध्ये सातारच्या प्रतीसरकारचे योगदान महत्वपूर्ण होते. क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या सरकारच्या तुफान सेनेचे फिल्ड मार्शल क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड, क्रांतिवीर नागनाथआण्णा नायकवडी यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्या बरोबरच गुंडशाही, सावकारकी व जमिनदारी समूळ नष्ट करण्याचे काम प्रतिसरकारने केले होते,

स्वर्गीय क्रांतीअग्रणी जी. डी . बापूंनी स्वातंत्र्यानंतरही तंटामुक्ती, दारुबंदी, अस्पृश्यतः . निवारण यासारख्या उपक्रमातून ही समाजाभिमुख चळवळ पुढे सुरु ठेवली. त्यांच्या कृतिशिल विचारांचा वारसा घेऊन महाविद्यालयीन तरुणांच्या वैचारिक अभिव्यक्तीला एक समर्थ व्यासपिठ मिळवून देण्याच्या उद्देशाने राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेमध्ये जी. डी. बापू लाड एक क्रांतीअग्रणी, संवाद हरवलेल कुटूंब, आरक्षण:समताधिष्टीत समाज निर्माण करु शकेल?, संघर्ष, शेतकर्यांना कर्जमाफी की हमीभाव हवा, नोटाबंदीचे वादळ, सोशल मिडीया: प्रबोधन की मोहजाल, असे विषय असून प्रथम क्रमांकासाठी सात हजारांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये जास्तीत जास्त महाविद्यालयीन युवक युवतींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# कुंडलमध्ये राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा बुधवारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**कुंडल :** येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये ९ ऑगस्ट या क्रांती दिनाचे औचित्य साधून राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेचे हे दुसरे वर्ष असल्याची माहिती या स्पर्धेचे निमंत्रक, जिल्हा परिषदेचे गटनेते शरद लाड यांनी दिली.

ते म्हणाले की, क्रांतिअग्रणी जी. डी. बापूंनी स्वातंत्र्यानंतरही तंटामुक्ती, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण अशा उपक्रमांतून ही समाजाभिमुख चळवळ पुढे सुरु ठेवली. या त्यांच्या कृतिशील विचारांचा वारसा घेऊन तरुणांच्या वैचारिक अभिव्यक्तीला एक समर्थ व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने महाविद्यालयामध्ये ९ ऑगस्ट रोजी राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, या स्पर्धेमध्ये जी. डी. बापू लाड एक क्रांतिअग्रणी,' संवाद हरवलेले कुटुंब, आरक्षण : समताधीष्ठित समाज निर्माण करु शकेल?, संघर्ष, शेतकऱ्यांना कर्जमाफी की हमीभाव हवा, नोटाबंदीचे वादळ, सोशल मीडिया : प्रबोधन की मोहजाल असे विषय असून, प्रथम क्रमांकासाठी सात हजारांचे बक्षीस ठेवण्यात आले आहे.

या स्पर्धेमध्ये जास्तीत-जास्त युवक-युवतींनी सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे, डॉ. प्रताप लाड, प्रा. जगन्नाथ पाटील, प्रा. डॉ. बाळकृष्ण वाघमारे, प्रा. डॉ. धनंजय होनमाने, प्रा. गणेश खारगे उपस्थित होते.

तरुण भारत - ११/०८/२०१८

# डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा

कुंडल
वार्ताहर

वाचनाचे तेल तुमच्या तळाशी असेल तर तुमच्या शब्दांचा दिवा सदैव तेवत राहील, असे उद्गार प्राचार्य यशवंत पाटणे यांनी काढले. ते कुंडल येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयामध्ये आयोजित दुसऱ्या क्रांतिअग्रणी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलत होते. यावेळी क्रांती कारखान्याचे अध्यक्ष अरुण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जिल्हा परिषद सदस्य व या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष व निमंत्रक शरद लाड, प्राचार्य डॉ.के.एम.नलावडे हे प्रमुख उपस्थित होते.



कुंडल : दुसरे राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्ध्येच्या उद्‌घाटन प्रसंगी बोलताना प्राचार्य यशवंत पाटणे, अरुण लाड, किरण लाड, शरद लाड

ते म्हणाले, समाजाला जागे करायचे असेल तर वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन झाले पहिजे. यासाठी समाजातील प्रतिष्ठीत मंडळिंनी पुढे येणे आवश्य आहे. संस्कार आणि नितीमुल्ये जपली पाहिजेत. जग सुधारण्याची वेळपाहु नका त्यासाठी पहिल्यांदा स्वत: पासून सुरुवात करा. तरुण पिढीमध्ये वाचन संस्कृतीचा अभाव दिसत आहे. आपण जे बोलतो तसेच आपले आचरण असले पाहिजे, तरच समाजात आपणाला स्थान प्राप्त होईल. स्वत: जी.डी.बापू ही उत्तम वक्ते होते. यावेळी अरुण लाड म्हणाले, नवीन पिढीला इतिहास माहित असणे आवश्यक आहे.

या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष शरद लाड म्हणाले, आज ग्रामीण भागात अनेक चांगले वक्ते आहेत पण त्यांना चांगले व हक्काचे व्यासपीठ मिळत नव्हते म्हनुन गेल्यावर्षी पासुन या ग्रामीण भागात क्रांतिअग्रणी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून त्यांना हक्काचे व्यासपीठ दिले.

यावेळी सुरज चौगुले, स्नेहा गायकवाड, डॉ.व्ही.डी.पाटील, कुंडलिक एडके, कॉ. सुभाष पवार, जयवंत आवटे, शामराव सावंत, प्राचार्य के.एम.नलवडे, दीपक स्वामी, प्रा.संतोष काळे, प्रा.संपतराव पार्लेकर, मुख्याध्यापक सी.वाय.जाधव, शहाजी लाड, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. तरुण भारत ता - ११/०८/२०१८

सकाळ · ११/०८/२०१७

# क्रांतिअग्रणी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे उद्‌घाटन

कुंडल, ता.१० : वाचनाचे तेल तुमच्या तळाशी असेल तर तुमच्या शब्दांचा दिवा सदैव तेवत राहील, असे मत प्राचार्य यशवंत पाटणे (सातारा) यांनी व्यक्त केले. कुंडल (ता. पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये आयोजित दुसरी क्रांतिअग्रणी राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी पाऊलखुणांनीच भविष्यात वाटचाल करणे सोपे जाईल. शरद लाड म्हणाले, आज ग्रामीण भागात अनेक चांगले वक्ते आहेत. पन त्यांना चांगले व हक्काचे व्यासपीठ मिळत नव्हते. म्हणून गेल्या वर्षीपासून वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करून त्यांना हक्काचे व्यासपीठ दिले. सुरज चौगुले, स्नेहा गायकवाड, डॉ. व्ही. डी.पाटील,

लोकमत - १८/०८/२०१८

# ऐश्वर्या भद्रे, विक्रांत पाटीलला विजेतपद

## क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धा : कुंडलच्या जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कुंडल : कुंडल (ता. पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत मुंबईच्या रुईया कॉलेजच्या ऐश्वर्या संजीव भद्रे आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठ सांगली कॅम्पसच्या विक्रांत संभाजी पाटील यांनी प्रथम क्रमांक विभागून पटकावला. रोख सात हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

जिल्हा परिषदेचे गटनेते शरद लाड या स्पर्धेचे निमंत्रक होते. प्रमुख पाहुण्या कवयित्री डॉ. स्वाती शिंदे यांच्याहस्ते विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव शहाजी लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलवडे, सहसचिव चंद्रकांत रोकडे उपस्थित होते.



कुंडल (ता. पलूस) येथे झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या ऐश्वर्या भद्रे हिला डॉ. स्वाती शिंदे, शरद लाड यांच्याहस्ते पारितोषिक प्रदान करण्यात आले.

विशाल शिरतोडे व सिद्धेश मिसाळ यांना द्वितीय क्रमांक विभागून मिळाला, तर अलिशा मोहिते व अक्षय पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकावला. अभिजित बिरनाळे याने चौथा, तर निखिल नगरकर व विवेक चिते यांनी संयुक्तपणे पाचवा क्रमांक पटकावला. आकाश मनोहर पाटील याला उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. विजेत्यांना रोख बक्षीस, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दीपक स्वामी, प्रा. डॉ. सूरज चौगुले, प्रा. तुकाराम मस्के यांनी काम पाहिले.

स्पर्धेचे नियोजन महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले, तर संयोजन प्रा. डॉ. धनंजय होनमाने, डॉ. बाळकृष्ण वाघमारे, प्रा. जगन्नाथ पाटील आदींनी केले. प्रा. ऋषिकेश खारगे यांनी सूत्रसंचालन केले, तर धनंजय होनमाने यांनी आभार मानले.

दै. लोकमत ता-१८/०८/२०१८



कुंडल (ता. पलूस) येथील महाविद्यालयामध्ये आयोजित राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी प्राचार्य यशवंत पाटणे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अरुण लाड, किरण लाड, प्राचार्य के. एम. नलवडे, शरद लाड उपस्थित होते.

## यशवंत पाटणे : कुंडलमध्ये वक्तृत्व स्पर्धा

# वक्तृत्व हा विचारांचा आरसा

लोकमत न्यूज नेटवर्क


**कुंडल** : वक्तृत्व हा विचारांचा आरसा आहे. वाचनाचे तेल तुमच्या तळाशी असेल, तर तुमच्या शब्दांचा दिवा सदैव तेवत राहील, असे उद्‌गार प्राचार्य यशवंत पाटणे (सातारा) यांनी काढले.

कुंडल (ता. पलूस) येथील क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात आयोजित दुसऱ्या राज्यस्तरीय क्रांतिअग्रणी वक्तृत्व स्पर्धेच्या उद्‌घाटनप्रसंगी बोलत होते. यावेळी क्रांती कारखान्याचे अध्यक्ष अरुण लाड, क्रांती दूध संघाचे अध्यक्ष किरण लाड, जिल्हा परिषद सदस्य व या स्पर्धेचे निमंत्रक शरद लाड, प्राचार्य डॉ. के. एम. नलावडे प्रमुख उपस्थित होते. पाटणे म्हणाले, समाजाला जागे करायचे असेल, तर वत्कृत्व स्पर्धांचे आयोजन झाले पाहिजे. यासाठी समाजातील प्रतिष्ठित मंडळींनी पुढे येणे आवश्यक आहे. संस्कार आणि नीतीमूल्ये जपली पाहिजेत. यावेळी अरुण लाड म्हणाले, नवीन पिढीला इतिहास माहीत असणे आवश्यक आहे. इतिहासाच्या पाऊलखुणांनीच भविष्यात वाटचाल करणे सोपे जाईल.

शरद लाड म्हणाले, आज ग्रामीण भागात अनेक चांगले वक्ते आहेत, पण त्यांना हक्काचे व्यासपीठ नव्हते. म्हणून गतवर्षीपासून या स्पर्धेचे आयोजन केले आहे. यावेळी सूरज चौगुले, स्नेहा गायकवाड, डॉ. व्ही. डी. पाटील, कुंडलिक एडके, सुभाष पवार, जयवंत आवटे, शामराव सावंत, प्राचार्य के. एम. नलवडे, दीपक स्वामी, सी. वाय. जाधव, शहाजी लाड, सी. एल. रोकडे उपस्थित होते. ऋषिकेश खारगे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले, तर आभार प्रा. धनंजय होनमाने यांनी मानले.

केसरी - २६/०८/२०१८





कुंडल येथे झालेल्या राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविलेल्या ऐश्वर्या भद्रे हिचा सत्कार करताना डॉ. स्वाती शिंदे, शरद लाड, प्राचार्य डॉ. नलावडे व इतर मान्यवर.

# क्रांतिअग्रणी महाविद्यालयात राज्यस्तरीय वक्तृत्त्व स्पर्धा संपन्न

## टिळक विद्यापीठाच्या विक्रांत पाटीलने मिळवला प्रथम क्रमांक

**कुंडल : वार्ताहर**

येथील क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड महाविद्यालयामध्ये नुकतीच राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा झाली. दोन दिवस चाललेल्या या स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक टिळक महाराष्ट्र विद्यापीठ सांगलीच्या विक्रांत संभाजी पाटील आणि मुंबईच्या रुईया कॉलेजच्या ऐश्वर्या

द्वितीय क्रमांक विजेत्या विशाल मारुती शिरतोडे, सिद्धेश नंदकुमार मिसाळ या स्पर्धकांना रोख रु. ५००० सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र, तर तृतीय क्रमांक विजेत्या अलिशा अनिल मोहिते, अक्षय अरविंद पाटील या स्पर्धकांना रोख रु. ३००० रोख सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र,

परीक्षक म्हणून प्रा. डॉ. दीपक स्वामी, प्रा. डॉ. सूरज चौगुले, प्रा. तुकाराम मस्के यांनी काम पाहिले.

या स्पर्धेचे नियोजन महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यानी केले, तर संपूर्ण संयोजन प्रा. डॉ. धनंजय होनमाने, डॉ. बाळकृष्ण वाघमारे,